हिंदी विद्या प्रचार समितीद्वारा संचालित

**रामनिरंजन झुनझुनवाला कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय(अधिकारप्रदत्त स्वायत्त)**

**T.Y.B.A. Marathi VSC Syllabus Semester VI**

# Hindi Vidya Prachar Samiti's
# Ramniranjan Jhunjhunwala College of Arts, Science & Commerce
# (Empowered Autonomous College)

**Affiliated to**

**UNIVERSITY OF MUMBAI**

**Syllabus For T.Y.B.A. Sem V (level 5.5 under NEP-2020)**

**Program: B.A. MARATHI**

**Program Code: RJMAR**

**Course: Marathi VSC**

**Course Code: RJVSCMAR361**

**Sem VI (level 5.5)**

**CBCS**

**Multidisciplinary Degree Program with Multiple entry and Exit (NEP-2020)**

**2025-26**

## DISTRIBUTION OF TOPICS AND CREDITS
## TYBA Marathi VSC - Syllabus Semester VI
## मराठी व्यावसायिक कौशल्य अभ्यासपत्रिका

| Course code | Nomenclature | Credits | Topics |
|---|---|---|---|
| **RJVSCMAR361** | **पुस्तक परीक्षण** | **२** | १. पुस्तक परीक्षण - सैद्धान्तिक विचार<br>२. प्रत्यक्ष पुस्तक परीक्षण (कोणतीही २ पुस्तके)<br>मॉंटुकले दिवस- संदेश कुलकर्णी<br>अनवट- मिलिंद गुणाजी<br>मुळारंभ - आशुतोष जावडेकर |

# प्रास्ताविक

## मराठी भाषा आणि मराठी साहित्य का अभ्यासायचं?

मानवी भाषा हे भावना-विचार यांच्या संप्रेषणाचं अत्यंत महत्त्वपूर्ण माध्यम आहे. मातृभाषा ही मानवाला आईच्या गर्भात असल्यापासून अवगत असणारी गोष्ट आहे. जन्माला आल्यापासून आपण भाषा ऐकतो, ती आत्मसात करू लागतो,मग हळू हळू बोलू लागतो. आपल्या रोजच्या जीवनव्यवहारात श्वासाइतकीच भाषेची अपरिहार्य गरज आपल्याला असतोच. कारण माणूस हा समाजप्रिय प्राणी आहे आणि भाषा हे समाजव्यवहाराचं अविभाज्य अंग आहे. त्यामुळे भाषाप्रभुत्व ही यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली आहे. दैनंदिन व्यवहारापुरता भाषेचा वापर मर्यादित नाही. उत्तम भाषेचा संस्कार हा तुमच्या जगण्याला दिशा देणारा, जीवन घडवणारा असतो. भाषा तुमच्या भावनिक, सांस्कृतिक गरजांचं भरणपोषण करून व्यक्तिमत्त्वविकास घडवते.

भाषेचं हे सामर्थ्य लक्षात घेता, तिचं स्वरूप समजून घेणं, तिचा शास्त्रशुद्ध अभ्यास करणं किती अनिवार्य आहे हे तुमच्या लक्षात येईल.

प्रत्येक समाजाच्या भाषेची अशी काही खास वैशिष्ट्यं असतात. त्या त्या समाजाच्या भाषेमध्ये निर्माण होणारं साहित्य म्हणजे त्या समाजाचा भावनिक उद्गार असतो. त्या समाजातील साहित्य हे मानवी समाजाचं प्रतिबिंब असतं, असं मानलं जातं. प्रत्येक समाजातील सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक, भौगोलिक इ. परिस्थितीचा अभ्यास करायचा झाल्यास, त्या समाजात निर्माण झालेल्या साहित्याचा अपरिहार्यपणे आधार घ्यावा लागतो. म्हणजेच, साहित्याच्या अभ्यासाने या सर्व घटकांचं भान येतं,ज्ञान प्राप्त होतं. भाषा आणि साहित्य यांच्या अभ्यासाने आपण ज्ञानसमृद्ध आणि भावसंपन्न होतो.

मराठी भाषेला आणि साहित्याला अकराव्या शतकापासूनची प्रदीर्घ परंपरा आहे.

"माझा मऱ्हाटाची बोलु कवतिके। परि अमृतातेही पैजा जिंके। ऐसी अक्षरे रसिके। मेळवीन॥"

या शब्दांत ज्ञानदेवांनी आपल्या भाषेचं सामर्थ्य व्यक्त केलं. या सामर्थ्याची ओळख आपण अभ्यासक्रमाच्या माध्यमातून करून घेणार आहोत.

## आर.जे.मध्ये मराठी साहित्याचा अभ्यास का निवडायचा?

आपल्या महाविद्यालयाच्या स्थापनेपासून, म्हणजे १९६३ पासून मराठी विभागही अस्तित्वात आला. म्हणजेच मराठी विभागाला जवळजवळ ६० वर्षांची परंपरा आहे. मराठी विभागाबरोबरच मराठी वाङ्मय मंडळाचीही स्थापना झाली. अभ्यासक्रमाबरोबरीनेच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडावा आणि त्यांची वाङ्मयीन अभिरूची सुसंस्कारित व्हावी यांसाठी मराठी विभाग आणि मराठी वाङ्मय मंडळ भाषाविषयक विविध नवनवीन उपक्रमांचं आयोजन करीत असतं. प्रसिद्ध लेखकांची व्याख्यानं, लेखकांशी संवाद साधणाऱ्या मुलाखती, अभ्यासक्रमावर आधारित वृत्तांतलेखन स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, निबंधलेखन स्पर्धा तसंच 'आविष्कार' भित्तिपत्रक व हस्तलिखित व इ-अंक यांचंही आयोजन केलं जातं. मुलाखत तंत्र समजून घेण्यासाठी विद्यार्थ्यांना मुलाखतीची संधी उपलब्ध करून दिली जाते.

या व्यतिरिक्त विद्यार्थ्यांसाठी कौशल्यविकसन तसेच मूल्यवर्धित अभ्यासक्रमही मराठी विभागातर्फे घेतले जातात - जसे मराठी भाषा आणि मराठी साहित्यातील संवाद आणि मानवी मूल्य. या अभ्यासक्रमाच्या साहाय्याने विद्यार्थ्यांना व्यवसायाच्या दिशा उपलब्ध होऊ शकतात.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार मराठी साहित्याच्या अभ्यासक्रमाची आखणी करताना व्यावसायिक उपयोजन, कौशल्य विकसन व विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास ही गरज ओळखून उपयोजित मराठी, मराठी युनिकोड टंकलेखन, प्रमाण मराठी लेखन आणि मुद्रितशोधन कार्यालयीन पत्रव्यवहार , अर्जलेखन, वृत्त-वृत्तांतलेखन यांबरोबरच भाषांतर, जाहिरातलेखन, ग्रंथपरीक्षण या घटकांचाही अभ्यासक्रमात समावेश केला आहे.

तृतीय वर्ष कला शाखेच्या अभ्यासक्रमाची आखणी विद्यार्थ्यांना लोकसेवा आयोगाच्या विविध परीक्षांसाठी उपयुक्त होईल,याचे भान ठेवून केली आहे.

विद्यार्थ्यांनी मराठी या विषयाची निवड केल्यास व्यवहारचतुर आणि संवेदनशील व्यक्तिमत्त्व म्हणून विद्यार्थ्यांची जडणघडण होईल, अशी खात्री वाटते.

## व्यावसायिक कौशल्य अभ्यासपत्रिका (Vocational Skill Course)

## पुस्तक परीक्षण

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसारे **व्यावसायिक कौशल्य अभ्यासपत्रिका** ह्या एकूण अभ्यासक्रमाचा महत्त्वाचा भाग आहेत.कोणत्याही विषयाशी निगडीत व्यवसायात यशस्वी होण्यासाठी काही विशिष्ट कौशल्ये असणे आवश्यक असते. विषयाशी निगडीत ज्ञानसंपादन करताना अशी कौशल्येही विद्यार्थ्यांनी अंगी बाणवणे गरजेचे आहे. पुस्तक परीक्षण कौशल्य हे अशाच प्रकारचे व्यावसायिक भाषिक कौशल्य आहे. वर्तमानपत्रे, मासिके यासारख्या नियतकालिकांना मुद्देसूद परीक्षण करणाऱ्या अभ्यासकांची नेहमीच गरज असते. प्रकाशन व्यवसायालाही चांगल्या पुस्तक परीक्षणांमुळे मदतच होत असते. पुस्तक परीक्षण हे फक्त एक साहित्याशी संबंधित एक कौशल्य नाही तर कोणत्याही भाषेतील साहित्यसंस्कृतीचा, वाचनसंस्कृतीचा तो एक महत्त्वाचा घटक असतो. लेखक-वाचकांमधे दुवा निर्माण करणे,चांगल्या साहित्यनिर्मितीला उत्तेजन देणे आणि समाजाची अभिरूची घडविण्याचे कार्य पुस्तकपरीक्षणामुळे साधले जाते. प्रकाशन, पत्रकारिता, प्रसारमाध्यमे या सर्व व्यवसायांना परीक्षणकर्त्यांची गरज सर्वज्ञात आहे. ते लक्षात घेऊन या अभ्यासपत्रिकेची योजना करण्यात आली आहे.

| | | |
|---|---|---|
| SEMESTER | : | VI |
| CATEGORY UNDER NEP | : | Marathi VSC(VSEC) |
| TITLE OF THE SUBJECT/COURSE | : | Book Review |
| COURSE CODE | : | RJVSCMAR361 |
| CREDITS | : | 2 |
| DURATION | : | 30 Hours |

| **T.Y.B.A.<br>तृतीय वर्ष,<br>कला शाखा** | **Marathi VSC – BOOK REVIEW<br>मराठी व्यावसायिक कौशल्य अभ्यासपत्रिका<br>पुस्तक परीक्षण** |
|---|---|
| **अभ्यासपत्रिकेची उद्दिष्टे (Learning Objective):** | |
| १. | पुस्तकपरीक्षणाचे महत्त्व, प्रकिया इत्यादींचा परिचय करून देणे. |
| २. | प्रत्यक्ष साहित्यकृतींचे परीक्षण करण्याचे प्रात्यक्षिक दाखविणे. |
| ३. | पुस्तक परीक्षण करण्याच्या कौशल्यांचे प्रत्यक्ष व्यवसायक्षेत्रात उपयोजन करण्याची क्षमता विकसित करणे. |

| **CO. No. निष्पत्ती क्र.** | **अभ्यासपत्रिकेची निष्पत्ती (Course Outcome):** | **PSO Addressed** | **BLOOMS LEVEL** |
|---|---|---|---|
| **१.** | पुस्तकपरीक्षणाचे महत्त्व, प्रकिया इत्यादींचा परिचय होईल. | 1,2,3,4,6,9,10 | BT Level I, II, IV Remember, Understand, Analyze. |
| **२** | प्रत्यक्ष साहित्यकृतींचे परीक्षण करण्याचे प्रात्यक्षिक अनुभवता येईल. | 4,5,8,9,10. | BT Level I, II, III, IV, V, VI Remember, Understand, Apply, Analyze, Evaluate, Create. |
| **३.** | पुस्तक परीक्षण करण्याच्या कौशल्यांचे प्रत्यक्ष व्यवसायक्षेत्रात उपयोजन करण्याची क्षमता विकसित होईल. | 10 | BT level I, II, IV, V, VI Remember, Understand, Apply, Analyze, Evaluate. |

| **सत्र- ६** | | | **तासिका L** | **श्रेयांक Cr** |
|---|---|---|---|---|
| **मराठी व्यावसायिक कौशल्य अभ्यासपत्रिका – पुस्तक परीक्षण.** | | | **३०** | **२** |
| ***घटक- १*** | | | **१५** | **०१** |
| ***पुस्तक परीक्षण - सैद्धान्तिक विचार*** | | | | |
| अ. | पुस्तक परीक्षण करताना आवश्यक पूर्वतयारी | | | |
| आ. | पुस्तक परीक्षणकर्त्यास आवश्यक क्षमता/ कौशल्य | | | |
| ***घटक- २*** | | | **१५** | **०१** |
| ***प्रत्यक्ष पुस्तक परीक्षण (कोणतीही दोन)*** | | | | |
| अ. | माँटुकले दिवस- संदेश कुलकर्णी<br>अनवट- मिलिंद गुणाजी<br>मुळारंभ - आशुतोष जावडेकर | | | |

## संदर्भासाठी पुस्तकांची यादी-

१. व्यावहारिक मराठी, ल.रा.नसीराबादकर, भाषाविकास संशोधन संस्था, कोल्हापूर, २०२३.
२. व्यावहारिक मराठी अध्यापनाच्या दिशा, डॉ.सुभाष शेकडे,ऋतू प्रकाशन, अहमदनगर, २०१२.
३. तौलनिक साहित्य अभ्यास, वसंत बापट,पॉप्युलर प्रकाशन

**T.Y.B.A. SEM – VI**

**तृतीय वर्ष कला शाखा सत्र ६**

**मराठी व्यावसायिक कौशल्य अभ्यासपत्रिका (पुस्तक परीक्षण) (RJVSCMAR361)**

**परीक्षा योजना-**

१. सातत्यपूर्ण मूल्यमापन पद्धतीचा अवलंब केला जाईल. त्या अंतर्गत दोन तास कालावधीची ३० गुणांची सत्रांत परीक्षा व २० गुणांचे अंतर्गत मूल्यमापन होईल.
२. उत्तीर्ण होण्यासाठी सत्रांत परीक्षा आणि अंतर्गत मूल्यमापन दोन्ही मिळून किमान ४०% गुण मिळवणे आवश्यक आहे.
३. सत्रांत परीक्षेला बसणे अनिवार्य आहे. सत्रांत परीक्षेला न बसणारा विद्यार्थी अनुत्तीर्ण घोषित होईल.
४. राष्ट्रीय पातळीवरील अथवा तत्सम स्पर्धेत महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करत असल्यामुळे किंवा आजारपणामुळे जे सत्रांत परीक्षेला बसू शकणार नाहीत त्या विद्यार्थ्यांची प्राचार्यांच्या विशेष परवानगीने पूरक परीक्षा घेण्यात येईल.
५. प्राचार्यांच्या सोबत विचारविनिमयाने घेतलेला विभागप्रमुखांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

**सहावी सत्रांत परीक्षा – गुण ३०**

या अभ्यासपत्रिकेची सत्रांत परीक्षा प्रकल्पाच्या रूपात होईल. - ३० गुण

कथासंग्रह/कादंबरी/काव्यसंग्रह/ललितलेखसंग्रह/आत्मकथन/प्रवासवर्णन इत्यादी - पुस्तकाचे परीक्षण करणे.

या प्रकल्पासाठी पुस्तक पूर्वसंमत करून घेणे आवश्यक असेल.

**अंतर्गत मूल्यमापन – गुण २०**

चाचणी परीक्षा/ गृहपाठ/ प्रश्नमंजुषा/ सादरीकरण - २० गुण

चाचणी परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरूप पुढीलप्रमाणे ठरविण्यात राहील.

प्रश्न १. घटक १ वर आधारित प्रश्न ( पर्यायासह) -गुण १०

प्रश्न २. घटक २ वर आधारित प्रश्न ( पर्यायासह) -गुण १०

**30 Marks Project mapped to application and Create level of Blooms' Taxonomy Model Project/Assignments Assessment Rubrics**

| Parameters | Marks | (80 to 100%) Excellent | (60 to 80%) Good | (40 to 60%) Satisfactory | (20 to 40%) Average |
|---|---|---|---|---|---|
| **Content and Analysis written** | **20** | **16-20/20** | **12-16/20** | **8- 12/20** | **4-8/20** |
| **Creativity and Innovation in point of view and Analysis** | **5** | **4-5/5** | **3-4/5** | **2-4/5** | **1-4/5** |
| **Language Presentation and Communication Skills** | **5** | **4-5/5** | **3-4/5** | **2-4/5** | **1-4/5** |

**Mapping of Questions unit wise to Blooms Taxonomy**

| unit | Question | Remembering and understanding, | Analyzing, Applying, Evaluating | Total Marks |
|---|---|---|---|---|
| **I** | 1 | 10 | | 10 |
| **II** | 2 | | 10 | 10 |
| **Total** | | **10** | **10** | **20** |
| **% Weightage** | | **50%** | **50%** | **100 %** |

## अध्ययन अध्यापन प्रक्रिया(Teaching Learning Process)

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार, शिक्षणप्रक्रियेच्या केंद्रस्थानी विद्यार्थी आणि त्यांच्याद्वारा होणारे अध्ययन असते. तसेच विद्यार्थ्यांचा समग्र व्यकितमत्त्व विकास, कौशल्यविकसनावर भर, बहुविद्याशाखीय शिक्षण ही राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत अमलात आलेल्या शैक्षणिक रचनेची वैशिष्टये आहेत. याचे भान ठेवून अध्यापनपद्धती निवडल्या आहेत. विद्यार्थ्यांनी मूलभूत भाषिक कौशल्यांबरोबरच मराठी भाषेशी निगडीत विविध व्यवसायक्षेत्रात भाषिक ज्ञानाचे उपयोजन करण्याचे कौशल्यही आत्मसात केले पाहिजे हे अध्यापनाचे मुख्य उद्दिष्ट आहे. शिकण्याची प्रक्रिया आनंददायी होण्यासाठी अभ्यासक्रमात नेमलेल्या साहित्यकृतींच्या वाचनात व अर्थनिर्णयनात विद्यार्थ्यांचा जास्तीत जास्त सहभाग असावा या हेतूने पुढील विविध पद्धतींचा अवलंब केला जातो-

१. व्याख्यान - अभ्यासक्रमातील सैद्धांतिक, वर्णनात्मक, शास्त्रीय भागासाठी व्याख्यान पद्धती.
२. गटचर्चा- नेमलेल्या साहित्यकृतीच्या अर्थनिर्णयनासाठी.
३. अभिवाचन- कविता नाटक इत्यादींचे अभिवाचन, प्राध्यापकांद्वारा ध्वनिमुद्रित फिती.
४. सादरीकरण- विद्यार्थ्यांद्वारा साहित्यकृतीचे आकलन, विश्लेषण व रसास्वाद यांचे सादरीकरण. (सहाध्यायी अध्यापन, भूमिकांतर अध्यापन)
५. विद्यार्थ्यांद्वारे प्रकल्प / कार्यक्रम- यातून प्रत्यक्ष भाषिक कौशल्यांच्या उपयोजनाचा कार्यानुभव.
६. क्षेत्रभेट - वर्गात शिकलेल्या साहित्यप्रकारवैशिष्ट्ये, प्रवाह, बोली यांचे प्रत्यक्ष निरीक्षण करण्याची संधी.
७. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर- चित्रपट, लघुचित्रपट, माहितीपट, यूट्यूब व समाजमाध्यमांवरील ध्वनिफिती, चित्रफिती(ऑडिओ-व्हिडिओ क्लिप्स) पीपीटी
८. गुगल मीट- (ऑनलाईन व्याख्याने), गुगल क्लासरूम्ससारखे, मराठी विभाग यू ट्यूब वाहिनी यांचा समावेश असलेले जीसूट अध्ययन व्यवस्थापन व्यासपीठ, व्हॉट्सपसारखी समाजमाध्यमे- माहिती, अध्ययन साहित्य, प्रकल्प यांच्या देवाणघेवाणीसाठी.

## Mapping of the courses to employability / entrepreneurship / skill development

| Class | Course Name | Course Code | Unit No. And topics focusing on Employability / Entrepreneurship / Skill development | Employability / Entrepreneurship / Skill development |
|---|---|---|---|---|
| TYBA Sem VI | Marathi VSC BOOK REVIEW | RJVSCMAR361 | 1.Book Review- Theory<br>2.Book Review- any two from prescribed 3 books | 1. Linguistic Skills<br>2. Analytical Skills<br>3. Creative writing Skills<br>4. Free lancing- Self Employment<br>4. Employability in Newspaper |

## Mapping of Curriculum with relevance to local, regional, national and global Developmental needs

| Sr. No. | Class | Course Name | Course Code | Units/topics | Relevance |
|---|---|---|---|---|---|
| 1. | TYBA<br>Sem VI | Marathi VSC<br>BOOK REVIEW | RJVSCMAR361 | Unit 1,2 | Relevance to Local, regional Developmental Needs |

## Mapping of Curriculum with Cross cutting Issues Viz. Professional Ethics, Gender, human Values, Environment and sustainability

| Sr. No. | Class | Name of the Course | Course Code | Issues Addressed |
|---|---|---|---|---|
| 1. | TYBA Sem VI | Marathi VSC BOOK REVIEW | RJVSCMAR361 | Gender, human Values, Environment and sustainability |

## Mapping of Curriculum with Sustainable Development Goals (SDG) and NEP 2020

| Sr. No. | Class | Name of the Course | Course Code | SDG | NEP 2020 |
|---|---|---|---|---|---|
| 1. | TYBA<br>Sem VI | Marathi Major VSC BOOK REVIEW | RJVSCMAR361 | SDG 4(Quality Education) | Development of Critical Thinking Ability and Skill Development |